# एकात्मिक बाल विकास प्रकल्प कारंजा (घा.)
## बिट सारवाडी
## ता. कारंजा (घा.) जि. वर्धा

# नवोपक्रम २०२३-२४

## * ललित लालीमा शाश्वतेची *

# “मैत्र बियांचे”





## अंगणवाडीतून पर्यावरणाला साथ

**वर्धा :** समन्वय साधण्याची कला व सकारात्मक दृष्टीकोन असला की कुठेही चांगल काम करता येते. पर्यावरणपुरक बालस्नेही उपक्रमाला सुरवात करण्यात आली होती. त्यात आपल्याला काय करायचे आहे, हे शिवार प्रशिक्षणातून अंगणवाडी ताई आणि अंगणवाडी ताईच्या माध्यमातून पालकांपर्यंत पोहचविण्यात आल. पालक सभेचे आयोजनही करण्यात आले. त्यामुळे सकारात्मक वातावरण तयार झाल.एका सीताफळाच्या बी-

### राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीपासून 'गोष्ट एका बीची......' अंगणवाडी

पासून सुरू झालेला प्रवास प्रचंड उत्साह वाढविणारा ठरला.

आमच्या जवळ आमच्या चिमुकल्यांनी जमविलेल्या पंचवीसपेक्षा जास्त वाणाच्या बिया जमा झाल्यात. एवढया साऱ्या बियांच काय करणार म्हणून वन विभागाशी संपर्क साधण्यात आला. जमविलेल्या बिया रितसर राऊंड ऑफीसर चौधरी, वनरक्षक कदम, शरद डिग्रसे, चंदु डोंगरे यांना सुपुर्द करण्यात आल्या. अंगणवाडी ताईच्या मदतीने आठ हजार बेड असलेल्या ठीकाणी सीताफळाच्या बिया लावण्यात आल्या. उर्वरित बियांवर प्रक्रिया करून लावणार असल्याचे सांगण्यात आले.

शेण माती खताचा वापर करून सीडबाल कसे तयार करायचे ह्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

आजपर्यंत वनविभागाशी समन्वय साधून अशाप्रकारचे सहकार्य कुणी केले नसल्याचे राऊंड ऑफीसर श्री चौधरी यांनी भावना व्यक्त करुन, पर्यवेक्षिका ललिता आसटकर यांचे आभार मानुन पर्यावरण रक्षणाकरीता सर्वतोपरी मदत करणार असल्याचे मत व्यक्त केले. प्रसंगी सारवाडी बिटमधील सर्व अंगणवाडी ताई उपस्थित होत्या.



*** नवोपक्रम कर्ता ***

**सौ. ललिता उमेश आसटकर**
**पर्यवेक्षिका**
**बिट - सारवाडी**

# स्पर्धकाची माहीती

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नांव | : | ललिता उमेश आसटकर |
| भ्रमणध्वनी | : | ९९७०६७०५२६ |
| कार्यालयीन पत्ता | : | आय.सी.डी.एस. प्रोजेक्ट कारंजा (घा) जि. वर्धा |
| शैक्षणिक पात्रता | : | एम. ए. बी. एड. |
| ई-मेल | : | lalitaasatkar23@gmail.com. |
| नवोपक्रम विषय | : | पर्यावरण |
| नवोपक्रमाचे शिर्षक | : | मैत्र बियांचे |

| अ.क्रं. | नवोपक्रम | पान क्रं. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 01 |
| 2 | नवोपक्रमाची गरज व महत्व | 01 |
| 3 | नवोपक्रमाचे उद्दिष्टय | 02 |
| 4 | संबंधीत व्यक्तींशी चर्चा | 03 |
| 5 | आवश्यक साधनांचा विचार | 03 |
| 6 | करावयाच्या कृतीचा क्रम | 04 |
| 7 | उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण | 05 |
| 8 | कार्यवाहीचे टप्पे व पुरावे | 05 |
| 9 | नवोपक्रमाची कार्यपध्दती | 11 |
| 10 | पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी, माहीती संकलन | 12 |
| 11 | उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेले निरीक्षण व नोंदी व नवोपक्रमाची यशस्विता | 13 |
| 12 | समारोप | 14 |

## प्रस्तावना : -

अंगणवाडीत नियमितपणे क्षेत्र भेटीसाठी गेली असता अंगणवाडीतील एका चिमुकल्याने रस्त्यात त्याला सापडलेल्या दोन सिताफळाच्या बिया हातात ठेवल्या. अंगणवाडी ताई म्हणाल्या अरे काय करतोस ? मॅडमला काय देत आहे. दोन बिया! माझ्याही नकळत मी म्हणाले दोन बिया नाही तर दोन झाड देत आहे आणि डोक्यात एक कल्पना आली, आणि येथुनच सुरु झ ाला मैत्र बियांचा प्रवास.

## नवोपक्रमाची गरज व महत्व : -

आम्ही जेथे काम करतो तो कारंजा तालुका निती आयोगाने आकांक्षीत तालुका म्हणून घोषित केलेला आहे. त्यामुळे Aspirtion to inspiration हा प्रवास आम्हाला करायचा आहे. आयुष्याच्या प्रयोगशाळेत चांगले प्रयोग घडावे, बाहेरच्या गोंधळात आत सूर लागावा, काही तरी शाश्वत घडावं, म्हणून हा उपक्रम हाती घेतला. अंगणवाडी ही बालकांवर संस्कार करणारे एक केंद्र आहे. बालपणापासुनच बालंकामध्ये मुल्य संस्कार रुजविले की पुढे ती सुजान बनतात. कां जगयाचं? कशासाठी? यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे स्वत:च शोधायची असतात. आपण स्वत: सह बालकांना सामाजिक जाणिवे चे शिक्षक करावे, बऱ्याच गोष्टी हया निसर्गाच्या साधिन्यात राहूनच कळत असतात. सामाजिक विश्व हे अत्यंत गुंतागुंतीचे झालेले आहे. ईश्वराने ही पृथ्वी निर्माण केलेली आहे. तिचे जतन करणे ही आपलेच काम आहे. आधुनिक काळात पूर्व शालेय शिक्षणापासुनच याची सुरुवात होणे आवश्यक आहे. संस्कारक्षम वयात सामाजिक जाणीवेचे शिक्षण देऊन त्याला गुणवत्तेची जोड देणे गरजेचे असल्याने हा उपक्रम राबविण्यांत आला.

अंगणवाडी हे केवळ खिचडी वाटप केंद्र नसुन बालकांचा भावना विश्व समजून घेणारी आनंददायी शिक्षण देणारी केंद्र असुन हीच भावना पालकांना मध्ये सुध्दा रुजविणे, समुदाय सहभाग घेणे, त्यातून पूर्व शालेय शिक्षणाची तयारी करुन घेऊन बालकांचा पाया मजबुत करणे, बालक हे केंद्रबिंदू असून त्याला सुरक्षित वातावरण निर्माण करुन देणे ही सर्वांचीच जबाबदारी असुन त्याची जाणीव करुन देण्यासाठी हा नवोपक्रम निवडला.

## नवोपक्रमाची उददि्ष्टये :-

आपण जे बघतो, आपल्याला जे दिसते त्याच्या पलीकडे ही शिक्षण असते.

1) एक बी जगण्याचा संघर्ष शिकविते, लढण्याची जिंकण्याची जिद्द निर्माण करते. हे समजून देणे.
2) समाजाला कशाची गरज आहे हे ओळखुन आपली गरज आपणच पूर्ण करायची असते ही भावना आपल्या कृतीतून रुजविण्यासाठी
3) मोबाईल, टिव्ही, यासारख्या स्क्रीनपासून दूर ठेवण्यासाठी, अंगणवाडीत पुर्व शालेय शिक्षणासाठी साहीत्या सह कोपरे तयार करणे.
4) हसत खेळत ताण येऊ न देता योग्य वयात योग्य गोष्टी बिंबविणे, निसर्गाची जोपासणा करण्यासाठी कणा असणारी पिढी घडविणे
5) जल, जंगल, जमीन, जनावर यांच्या वापराबाबत संवेदनशिलता वाढविणे
6) शाश्वत ध्येयाकडे वाटचाल करुन रुजवणे, फुलवणे, पूर्णवापर करण्याची कला निर्माण करुन आयुष्याच्या प्रयोगशाळेत चांगले प्रयोग घडविण्याचे उददि्ष्टये साध्य करणे.

## नवोपक्रमाचे नियोजन: -

### 1) उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण : -

अंगणवाडीतील बालकांचे पूर्व शालेय शिक्षण दर्जेदार व्हावं यासाठी पालक आणि समुदायांनी मदत करावी. अंगणवाडीचं महत्व पटाव यासाठी जास्तीत जास्त समुदायातील व्यक्ती अंगणवाडीत येणे गरजेचे होते. अंगणवाडीत न येण्याची कारणे शोधण्यात आली, **Low cost No cost** अशी कोणती उपक्रम आपण राबवू शकतो यासाठी परिसरात उपलब्ध असलेल्या साहित्याच्या माध्यमातून पूर्व शालेय शिक्षण घेतांना त्याचा वापर कसा करता येईल, प्रत्यक्ष शिक्षण देतांना त्याचा वापर करणे यासाठी आपण काय करु शकतो, भौगोलीक परिस्थितीचे अवलोकन केले असता हया भागात संत्री, सिताफळ यांची झाडे असून यांच्या बिया कोठेही पडून असल्याचे दिसून आले. बालक, पालक अंगणवाडी ताई हयांच्यातील नाते दृढ व्हावे उपक्रमाच्या माध्यमातून शाश्वत विकासा सोबतच पूर्व शालेय शैक्षणिक साहित्य निर्माण व्हावे, समाजातील प्रत्येक घटकाला बालक हे आपली जबाबदारी आहे याची जाणीव व्हावी म्हणून विचारपूर्वक एकत्रित उपक्रमाचे नियोजन करण्यांत आले.

## नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा: -

प्रस्तुत उपक्रम हा सारवाडी बिट मधील सर्व अंगणवाडी सेविका, पालक, बालक यांच्यासाठी राबविण्यांत आला. 3 जानेवारी 2023 ते 31 ऑक्टोबर 2023 या कालावधीत राबविण्यांत येऊन पुढेही त्यात सातत्य ठेवण्यांत आलेले आहे.

## संबंधीत व्यक्तींशी चर्चा:-

अंगणवाडी ताई, मदतनिस ताई, वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, बचतगटाच्या महीला, पालक, बालक यांच्याशी चर्चा करण्यांत आली.

## आवश्यक साधनांचा विचार:-

1) अंगणवाडी ताई, मदतनिस ताई यांची सभा घेऊन उपक्रमाची ओळख करुन दिली. त्यामध्ये आपण टप्प्या टप्प्याने कसे काम करणार आहोत हे स्पष्ट केले.
2) बालक-पालक व समुदायातील व्यक्तींच्या कृतीला प्रोत्साहन देण्याचे ठरविले. उपलब्ध झ ाालेल्या बियांचा उपयोग कसा करायचा यावर चर्चा करण्यांत आले.
3) शैक्षणिक साहित्य कशा प्रकारे तयार करायचा व त्याचा वापर कसा करायचा याबाबत माहीती देण्यांत आली.
4) हसत खेळत, तणावरहीत बालस्नेही वातावरणात उपक्रम साकार करायचा असल्याने कोणावरही सक्ती करायची नाही ही गोष्ट स्पष्ट केली.
5) पालक-बालक यांच्याकडून आलेली प्रत्येक गोष्ट स्विकारुन त्याचे वर्गीकरण व्यवस्थीत करण्याचे ठरविले. यासाठी कुठलाही खर्च येणार नाही याची खात्री करावी.
6) सिडबॉल कार्यशाळेसाठी लागणारे साहित्य, समुदायातूनच गोळा करायचे ठरविले.

## करावयाच्या कृतीचा क्रम:-

1) बिया गोळा करणे

2) वर्गीकरण

3) वर्गीकरणानुसार पॅकींग

4) वनविभागाशी संपर्क

5) सिडबॉल कार्यशाळेचे आयोजन

6) माळेगांव नर्सरीत उपलब्ध असणाऱ्या बेड मध्ये 8000 बियांचे रोपन

7) पूर्व शालेय शिक्षणासाठी दर्जेदार साहित्य निर्मिती.

8) पोषण अभियानामध्ये प्रदर्शनी

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

1) 25 प्रकारच्या बियांचा संग्रह झाला.

2) यशस्वी सिडबॉल कार्यशाळेचे आयोजन

3) त्यावर काही बियांवर वनविभागाने प्रक्रिया केली.

4) 8000 बियांचे प्रत्यक्ष माळेगांव रोपवाटीकेत बीजारोपन करण्यांत आले.

5) तयार झालेल्या हिरवेगार रोपांचे वृक्षारोपन करण्यांत आले.

6) दर्जेदार पूर्व शालेय साहित्याची निर्मीती.

## कार्यवाहीचे टप्पे:-

## कालावधी :-

1) 3 जानेवारी 2023 ते 12 जानेवारी 23 दरम्यान विविध स्तरावर सभा, चर्चा, गृहभेटीचे आयोजन करण्यांत आले.
2) जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीच्या समन्वयाने शिवार प्रशिक्षणाचे आयोजन.
3) बालकांसाठी प्रत्येक अंगणवाडी निहाय पाखरांची शाळा भरविण्यांत आली.
4) बियांचे बालक, पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्याकडून संकलन,
5) सिडबॉल कार्यशाळेचे आयोजन.
6) वनविभागाच्या मदतीने 8000 बियांचे बिजारोपन
7) रोपांचे वितरण

## उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

### 1) युटयुब लिंक

https://youtu.be/xuFDNWvqPZ8?si=oq9HSksM0D8oNjKi

https://youtu.be/xaHjCKpfUQ0?si=J6xSvvSf6bSwH9Kp

### 2) वर्तमान पत्रात आलेल्या बातम्या



दि.१८ फेब्रुवारी २०२३ दैनिक जनप्रभात ४

**शिवारातुन अंगणवाडी ताईंना प्रशिक्षणाचे धडे**

**वर्धा :** प्रशिक्षण म्हणजे नविन काही शिकण्याची व शिकविण्याची संधी. कार्यक्षेत्रात काम करीत असतांना सकारात्मक दृष्टीकोन, दृढ संकल्प, जुन्या प्रश्नांना नव्याने भिडण्याची क्षमता वृद्धीगत करणे, पाठपुराव्यात सातत्य ठेवणे. यासाठी पर्यवेक्षकीय यंत्रणेकडून सतत उर्मी निर्माण करणारे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

ललिता आसटकर यांच्या संकल्पनेतुन शिवार प्रशिक्षणाचे आयोजन जसापुर येथील नर्सरीमध्ये वनविभागाच्या सहकार्यानुन प्रत्यक्षात साकार करन्यात आले.

विविध विषयाच्या केंद्रस्थानी अंगणवाडी असते त्यानुसार तेथे कार्यरत अंगणवाडी ताई आणि मदतनिस ताईला कार्य करावे लागते, हे कार्य करतांना प्रेरणा, सकारात्मक दृष्टिकोन, नाविन्याचा ध्यास, तळागाळात जाऊन काम करण्याची इच्छा, आपण जिथे कार्यरत आहोत त्या तिथे प्रामाणिकपणे काम करून समोरच्याला आपण देणे लागतो ही भावना वृद्धीगत होण्यासाठी चा-गल्या वातावरणात प्रशिक्षणाची गरज असते.

हया सर्वाचा विचार करून ललिता आसटकर यांच्या संकल्पनेतुन शिवार प्रशिक्षणाचे आयोजन जसापुर येथील वनविभागाच्या नर्सरीमध्ये करण्यात आले. निसर्गाच्या सानिध्यात सकारात्मक वातारणात प्रशिक्षण घेऊन आपल्या कामाशी प्रामाणिक राहण्याचा संकल्प उपस्थित प्रशिक्षणार्थी यांनी घेतला. निसर्ग ज्याप्रमाणे भरभरून देतो, नवनविन प्रयोग सृजन घडवून आणतात. परिसरातुन बालकाला आपण बरेच काही शिकवून कार्यमग्न ठेवू शकतो. शिवार प्रशिक्षणापासून 'गोष्ट एका बी ची, कथा बाल स्नेहीची' ह्या उपक्रमाला सुरवात करण्यात आली.

एका 'बी'चा उपयोग अंगणवाडी बालस्नेही करण्यासाठी कसा उपयोग होईल हे प्रत्यक्ष काम करून च कळेल . नक्कीच हा प्रवास रंजक असणार आहे.

कुठल्याही कार्यक्षेत्रात काम करतांना योग्य प्रकारे दिले जाणारे प्रशिक्षण , भूमिका समजून प्रत्यक्ष काम करण्यास प्रेरणा देणारे आहे. विविध विभागाशी उत्तम समन्वय साधल्यास अत्यंत कमी खर्चात किंवा कोणताही खर्च न करता आपल्याला उपक्रम राबविता येतात.

आपल्या अधिनस्त यंत्रणेला सतत सकारात्मक कार्य करण्यास प्रेरीत करण्यास प्रशिक्षण उत्तम माध्यम असून शिवार प्रशिक्षण ही नाविन्यपुर्ण संकल्पना नक्कीच उपयुक्त ठरेल असा आशावाद ललिता आसटकर बालस्नेही प्रशिक्षक यशदा पुणे जिल्हा परिषद वर्धा यांनी व्यक्त केला.



**स्वतःसाठी सावली स्वतःच तयार करायची असतेः ललिता आसटकर**

**आरंभतुन साकारला 'मैत्र बियांचे'**

कारंजा (घा.) ■ गौरव सोमकुंवर

अंगणवाडीतून पर्यावरणाला साथ समन्वय साधण्याची कला व सकारात्मक दृष्टीकोन असला की कुठेही चांगल काम करता येते. राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीपासून ' गोष्ट एका बीची ' हा अंगणवाडीतुनपर्यावरणपुरक बालस्नेही उपक्रमाला सुरवात करण्यात आली होती. त्यात आपल्याला काय करायचे आहे , हे शिवार प्रशिक्षणातून अंगणवाडी ताई आणि अंगणवाडी ताईच्या माध्यमातून पालकांपर्यंत पोहचविण्यात आल. पालक सभेचे आयोजनही करण्यात आले. त्यामुळे सकारात्मक वातावरण तयार झाल.एका सीताफळाच्या बीपासून सुरू झालेला प्रवास प्रचंड उत्साह वाढविणारा ठरला.

आमच्या जवळ आमच्या चिमुकल्यांनी जमविलेल्या पंचवीसपेक्षा जास्त वाणाच्या बिया जमा झाल्यात. एवढ्या साऱ्या बियांच काय करणार म्हणून वन विभागाशी संपर्क साधण्यात आला. जमविलेल्या बिया रितसर राऊंड ऑफीसर चौधरी, वनरक्षक कदम, शरद डिग्रसे, चंदु डोंगरे यांना सुपुर्द करण्यात आल्या. अंगणवाडी ताईच्या मदतीने आठ हजार बेड असलेल्या ठीकाणी सीताफळाच्या बिया लावण्यात आल्या. उर्वरित बियांवर प्रक्रिया करून लावणार असल्याचे सांगण्यात आले.

शेण माती खताचा वापर करून सीडबाल कसे तयार करायचे ह्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. व सीड बॉल तयार करून वनविभागाच्या सुपुर्द करण्यात आले. बी अंकुरून झाड कुठेही रुजले तरी सावली व फळे सगळ्यांनाच मिळेल , त्यातुन थोडं का होईना पृथ्वीच ऋण फेडता येईल. आजपर्यंत वनविभागाशी समन्वय साधून अशाप्रकारचे सहकार्य कुणी केले नसल्याचे राऊंड ऑफीसर श्री चौधरी यांनी भावना व्यक्त करून, पर्यवेक्षिका ललिता आसटकर यांचे आभार मानुन पर्यावरण रक्षणाकरीता सर्वतोपरी मदत करणार असल्याचे मत व्यक्त केले. प्रसंगी सारवाडी बिटमधील सर्व अंगणवाडी ताई उपस्थित होत्या.

आरंभ उपक्रमाचा फायदा ,सेविकांची मेहनत त्यामुळे अजुनही बियांचा ओघ कमी झाला नाही.आरंभ चा उद्देश केवळ गृहभेट , शिक्षणच नसून, सुपोषण देखील आहे, या उपक्रमातुन बालकांना विविध फळ, बियांची ओळख होऊन आहारात समावेश होत आहे, पुर्वशालेय शिक्षणासाठी उपयुक्त साहित्य निर्मिती करता येत आहे. सोबतच पालकांची अंगणवाडीसाठी समुदाय वर्तणुक बदलासाठी मदत मिळत असल्याची व त्यातुन अंगणवाडी पुरक उपक्रम राबविणे, बालकांमध्ये नकळत नैतिक मुल्य रुजविणे सहज शक्य होते . हे सगळे माझ्यासाठी वाव मोमेंटअसल्याची माहीती ललिता आसटकर यांनी माध्यम प्रतिनिधी यांना दिली.

## अंगणवाडीतून पर्यावरणाला साथ



**साहसिक वृत्त / २६ फेब्रुवारी**

**सारवाडी :** अंगणवाडी पर्यावरणपुरक बालस्नेही उपक्रमाला सुरवात करण्यात आली होती. त्यात आपल्याला काय करायचे आहे , हे शिवार प्रशिक्षणातून अंगणवाडी ताई आणि अंगणवाडी ताईच्या माध्यमातून पालकांपर्यंत पोहचविण्यात आल. पालक सभेचे आयोजनही करण्यात आले. त्यामुळे सकारात्मक वातावरण तयार झाल.एका सीताफळाच्या बीपासून सुरू झालेला प्रवास प्रचंड उत्साह वाढविणारा ठरला.

आमच्या जवळ आमच्या चिमुकल्यांनी जमविलेल्या पंच-वीसपेक्षा जास्त वाणाच्या बिया जमा झाल्यात. एवढया साऱ्या बियांच काय करणार म्हणून वन

**(उर्वरित पान २ वर)**

## शिवारात भरली पाखरांची शाळा



**साहसिक वृत्त / ३० डिसेंबर**

**वर्धा :** आयसीडीएस योजनेअंतर्गत अंगणवाडीतील बालकांसाठी विविध उपक्रम राबविले जातात, काही उपक्रम हे जाणीवपुर्वक राबविले तर त्याचा फायदा होतो.

सारवाडी बिट अंतर्गत सर्व अंगणवाड्यामध्ये परिसर सहलीचे आयोजन करण्यात आलेले असून याची सुरवात चिंचोली येथील अंगणवाडीतून करण्यात आली. जि. प. शाळेच्या शिक्षिका काशीवार, फोके यांच्या सहकार्यानेआशा तायवाडे, मनिषा डोबले, सुजाता डोंगरे यांनी चिमुकल्यासाठी नियोजन केले. अंगणवाडीत बालकांची पुर्वशालेय शिक्षणाच्या माध्यमातून शाळापुर्व तयारी करून घेणे अपेक्षित असते .परिसर सहीलीच्या माध्यमातून बालकांना जाणीवपुर्वक परिसराची ओळख, विज्ञान अनुभव , मातीशी सबंध, निसर्ग अनुभवता येतो. आयोजीत केलेल्या सहलीत बालकांना आंब्याला आलेला मोहर, काब-ंदीची जाळी, लिंबाचा बहर, संत्रा मोसंबी, पेरूचा आस्वाद, फुलांचा सुगंध , निसर्गातील रंगाची ओळख, डोंगर , झाडी, पाने , आकार पालेभाज्यांची ओळख ,विहीरीतुन काढण्यात येणारे पाणी, आकाश, पक्षांचा आवाज, स्पर्श , चव , संवेदना ,मनोसोक्त मुक्त खेळ या सगळ्यामुळे बालकांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद बघायला मिळतो. चार भितीपलीकडील जग अनुभवता येते. बालकांना सोबत होती जिल्हा परिषद शाळेतील मुलांची.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार पहीला टप्पा तीन ते आठ वर्षाचा असून त्यातील सहा वर्षापर्यंतचा गट हा अंगणवाडीकडे आहे. शाळा व अंगणवाडी यांनी संयुक्त उपक्रम राबविले तर परस्पर पुरक होतात. अभ्यासक्रमाला उपक्रमाची जोड दिली तर अभ्यास हा आनंददायी , उर्जा, उत्साह, निरिक्षण बुद्धीला चालणा देणारा होत असल्याचे मत ललिता आसटकर आरंभ व आकार प्रशिक्षक यांनी व्यक्त केले.

## हसत खेळत करू व्यक्तीमत्व साकार : ललिता आसटकर

### आरंभतुन देऊ बालकाला आकार

**कारंजा (घा) ■ गौरव सोमकुंवर**

बालकाच्या जडणघडणीतील प्रत्येक टप्पा हा नाविन्याचा , रोचक आनंदादायी असतो. बाळ जन्माला येणे हे प्रत्येक कुटुंबासाठी उत्साहाचा क्षण असतो. बाळाच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण जाणीवपुर्वक साजरा करणे अत्यंत महत्वाचा असून त्यासाठी आरंभ उपयुक्त ठरत आहे. बाळाची जबाबदारी ही कुटुंबातील प्रत्येकाची असते त्यासाठी पालकासह निगा राखणाऱ्या व्यक्तीनाही जाणीवपूर्वक सामावून घेणे गरजेचे आहे. बाळाच्या वाढ विकासात कुटुंबाला मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे आहे . त्यासाठी अंगणवाडी सक्षम करुन प्रत्येक गावात त्या माध्यमातून काम होणे गरजेचे आहे.



कुटुंबियांनी दिलेल्या प्रेमातून , प्रोत्साहनातुन बालकाचा विकास आकार घेत असतो. यातुनच त्याच्या भविष्यातील हालचालींना वेग प्राप्त होत असतो. सहज सोप्या खेळातून , संवादातून, कृतीतून कुटुंबाचे सक्षमीकरण करणे सहज शक्य होते. येणाऱ्या समस्या त्यांची सहज उकल केल्यामुळे नकारात्मक भाव निर्माण होत नाही, निराशा टाळल्या जाते. प्रत्यक्ष प्रदर्शनी लावून जाणीवपुर्वक जनजागृती केली की पालक, निगा राखणाऱ्या व्यक्ती, समाजातील इतर व्यक्ती, यांच्यात कुतुहुल निर्माण होऊन आपण सहज त्यांच्याशी खेळ ,कृतीच्या माध्यमातून संवाद साधून सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होते.

संपत्तीच जस प्रत्येकजण जतन करून वृद्धी करतो. तसेच बालक ही संपत्ती आहे त्यांच जडणघडण, वाढ, विकास जाणीवपुर्वक होणे गरजेचे आहे. तरच बालसंगोपन योग्य दिशेने होईल , आयसीडिएस मध्ये काम करतांना आरंभ उपक्रमामुळे कुटुंब, पालक, निगा राखणाऱ्या व्यक्तींचे योग्य पध्दतीने संवाद साधून समुपदेशन करणे सहज सोपे जाते.पंचायत समिती कारंजा अंतर्गत लावलेल्या प्रदर्शनीला मा.आमदार श्री दादारावजी केचे साहेब, मा.उपविभागीय अधिकारी श्री. हरिष धार्मिक साहेब व इतर अधिकारी यांनी भेट देऊन आरंभ बाबत संपुर्ण माहीती जाणून घेऊन समाधान व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. आरंभ प्रशिक्षणामुळे सेविका प्रशिक्षित होऊन आपल्या कार्यक्षेत्रात उत्तम काम करीत आहेत, ही बालसंगोपनासाठी सृजनशील बाब असल्याचे आरंभ कि ट्रेनर ललिता आसटकर यांनी सांगितले.

## 3) फेसबुक लिंक

https://www.facebook.com/lalita.asatkar.33?mibextid=ZbWKwL

## 4) फोटो
























जि. प. उच्च प्राथमिक शाळा, जसापूर, पं.स. कारंजा (घा.) जि. प. वर्धा




शेतकऱ्यांसाठी
पीएम कुसुम








## नवोपक्रमाची कार्यपध्दती :-

फ्रेबुवारी महीन्यात सुरु केलेल्या उपक्रमाला उत्कृष्ठ असा प्रतिसाद लाभला, प्रत्यक्ष कार्यवाही मध्ये बालक, पालक, शिक्षक, विद्यार्थी समुदायातील व्यक्ती यांनी सवोतपरी मदत केली. बालकही आपला जास्तीत जास्त वेळ नविन काही तरी शोधण्यांत घालवू लागले. त्यांच्या प्रत्येक कृतीची अंगणवाडीत, घरी दखल घेतल्या गेल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास वाढून बालके बोलकी झाली.

## पुर्वस्थितीचे निरीक्षणे त्यांच्या नोंदी, माहीती संकलन :-

| अ.क्रं. | सहभागी | सहभागी संख्या | लाभ |
|---|---|---|---|
| 1 | अंगणवाडी सेविका | 21 | 21 |
| 2 | अंगणवाडी मदतनीस | 21 | 21 |
| 3 | माता पालक | 750 | 750 |
| 4 | किशोरी | 75 | 75 |
| 5 | शिक्षक विद्यार्थी | 145 | 145 |
| 6 | वनविभाग | 25 | 25 |
| 7 | स्वयंसेवि संस्था | 02 | 02 |
| 8 | आजी आजोबा | 250 | 250 |




**बिट मधील सर्व सेविका मदतनिस सावळी येथील जि.प.शाळेतील मुली, सारवाडी बीट माता पालक, वनविभागाचे कर्मचारी, स्वयंसेवी संस्थाचे सहकार्य घेतले.**

## उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी :-

1) अंगणवाडी निहाय जमा झालेल्या बिया
2) एकत्रिकरण
3) वर्गीकरण
4) माळेगांव नर्सरी भेट देऊन अधिकाऱ्यांची भेट
5) पूर्व शालेय शैक्षणिक साहित्य व त्याचा उपयोग केल्याच्या नोंदी
6) प्रत्यक्ष लावलेल्या बिजांचे तयार झालेली रोपे
7) रोपांचे विविध प्रसंगानुरुप वाटप व प्रत्यक्ष लागवड
8) प्रत्यक्ष सहभागी झालेल्यांचे मनोगत
9) अंगणवाडीत शैक्षणिक कोपरे तयार झाली. बालकांच्या उपस्थिती सह समुदाय सहभाग वाढला.

## कार्यवाही करतांना आलेल्या अडचणी :-

1) समुदायातील उदासिनता दुर करण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न करावे लागले.
2) जमा केलेल्या बिया हया 25 प्रकारात विभागल्या परंतु काही बियांचे नांवेच माहीती नव्हते.
3) काही साहित्य तयार करुन उरलेल्या बियांचे काय करावे याचे उत्तर शोधावे लागले.

## नवोपक्रमाची यशस्विता :-

1) अंगणवाडी विषयी आकर्षण निर्माण होऊन, अंगणवाडी केंद्र हे ज्ञान देण्याचे भांडार असल्याचे, यातुन शाश्वत गोष्टी आपण साकार करु शकतो हे पुन्हा एकदा सिध्द झाले.
2) पोषण समृध्दता आपणच वाढवू शकतो, पर्यावरणाचे संरक्षण आपल्याच हातात असुन बालकांसाठी चांगल्या सवयी अंगीकारुन आपणच शक्तीमान होऊ शकतो.

3) आयुष्याच्या प्रयोगशाळेत चांगले प्रात्यक्षिक करुन शाश्वत विकास साधून बालस्नेही वातावरण आपणच निर्माण करु शकतो.
4) हसत खेळत योग्य गोष्टी रुजवून, नैतिक संस्कार बालंकावर घडवून कुतूहुल जिज्ञासा जोपासत येऊन, स्क्रीन पासुन दूर ठेऊन, दर्जेदार गुणवत्ता पूर्ण पूर्व शालेय शिक्षण देता येते. हे या उपक्रमाने सिध्द झाले. पुर्व शालेय शैक्षणिक साहित्य सह शैक्षणिक कोपरे तयार झाले. बालकांच्या उपस्थिती सह समुदाय सहभाग वाढला.
5) आपल्यासाठी सावली आपणच तयार करावयाची आहे. सिडबॉल तयार करणे हयातुन बालकांच्या स्नायुंचा विकास होऊन सृजनाचा आनंद बालकांसह पालकांनाही घेता आला.
6) अंगणवाडीत विविध बाबींसाठी समुदायाची मदत होऊन अंगणवाडी लोकाभिमुख होण्यास मदत होऊन समुदायत वर्तणुक बदल घडवुन आणता आला.

## समारोप :-

अंगणवाडी केंद्र हेआपल्या प्रामाणिक आणि सकारात्मक प्रयत्नाने ज्ञान देण्याचे भांडार म्हणुन उपयुक्त ठरल्यास मदत झाली. अंगणवाडीच्या माध्यमातुन शाश्वस्त गोष्टींची रुजवुन, जपणुक, बालपणापासुनच करता येऊन सुदृढ निकोप विचारसरणीचा नागरीक आपण घडवू शकतो. पालक व समाजाची बालकाप्रती संवेदशिलता वाढविता आली. आपण जिथे आहो तिथे योग्य प्रकारे काम केले तर ते इतरांसाठी प्रेरणादायी उपयुक्त ठरते. हा विश्वास आपल्या अधिनस्थ यंत्रणेमध्ये रुजविण्यासाठी उपक्रम उपयुक्त ठरला. राबविण्य्यांत आलेला उपक्रम हा सर्वासाठी उपयुक्त असल्याने आपोआपच सगळे जुळत गेले. या निमीत्ताने बालस्नेही उपक्रम राबवुन संस्कारक्षम वयात सामाजिक जाणीवेचे शिक्षण देऊन गुणवत्तेची जोड देण्यांत आली. पुर्व शालेय शिक्षण आनंददायी होऊन अंगणवाडया चिमुकल्याच्या किलबिलाटाने फुलू लागल्या. त्यांच्या कृतीची दखल घेतल्यामुळे आत्मविश्वास वाढीस लागुन पुर्व शालेय शिक्षणाला चालना मिळाली. प्रत्येक उपक्रम राबवितांना मला माझ्या अंगणवाडी भगिनींची मिळालेली साथ लाख मोलाची असुन त्यांच्याशिवाय प्रत्यक्षात काम करणे खरं तर कठीणच आहे. मी त्यांची ऋणी असुन सर्वांनी उपयोगी पडावे व प्रेरणा मिळावे म्हणुन एकात्मिक बाल विकास कारंजा जि.प.वर्धाचा एक प्रामाणिक प्रयत्न.

तंत्र, संदर्भ, मुलाखत, प्रश्नावली, गटचचा

# प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करण्यात येते की **"मैत्र बियांचे"** हाउपक्रम कारंजा येथील सारवाडी बीट मध्ये राबविलाकार्यक्षेत्रात काम करीत असताना अशा काही बाबी समोर येतात . जेव्हा संवाद साधला जातो .त्या संवेदनशील मनाला विचार करायला भाग पाडतात तेव्हा त्याची तीव्रता आपल्यालक्षात येतेप्रथा यांचा असलेला ,सामाजिक रूढी परंपरा . आपण जिथे काम करतो तिथे बऱ्याच .पगडा पुढील पिढीत होत असलेले त्याचे वहन दर्जेदार ,मानसिक ,शैक्षणिक ,समस्या आहेत पुर्व शालेय शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविणे गरजेचे असुन त्या माध्यमातून बालकांवर योग्य संस्कार करणे ही सर्वांचीच जबाबदारी असते. आपणच आपल्या बालकांचे शक्तीमान असुन त्यांच्यासाठी योग्य जबाबदारीने वागणे गरजेचे आहे याची जाणीव पालकांसह समुदायला करून देण्यासाठी बालकांमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी एक संकल्पना सुचली व ,त्या संकल्पनेला मूर्त रूप दिलेव त्याला . .नाविन्यपूर्ण उपक्रमाची जोड दिली

नवनवीन माहिती जाणून घेण्यास चिकित्सक बुद्धी निर्माण होऊन संशोधनास चालना देणारा उपक्रम लाभार्थ्यांना मार्गदर्शन शारीरिक मानसिक सुदृढ आरोग्य , पुर्व शालेय शिक्षणाला गुणवत्तेची जोड मिळावी म्हणून उपयुक्त ठरलेला आहेतसेच . .हा उपक्रम या आधी कुठेही सादर केलेला नाही .इतरानाही मार्गदर्शक ठरेल

नवोपक्रमक.

सौ.ललिता उमेश आसटकर.
पर्यवेक्षिका
एकात्मिक बाल विकास सेवा योजना कारंजा
जिल्हा परिषद, वर्धा

# महिला बाल कल्याण विभाग
# जिल्हा परिषदवर्धा ,

प्रमाणित करण्यात येते कि, **एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कारंजा** येथे **ललिता उमेश आसटकर पर्यवेक्षिका कारंजा** येथे कार्यरत आहेत ,बीट . स्वतःच्या संकल्पनेतून पूर्व .जिल्हा व राज्य स्तरावर त्यांनी उत्कृष्ट कार्य केलेले आहे शालेय शिक्षणासाठीवििवध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविलेले असून त्याचा उपयोग अंगणवाडीतील लाभार्थ्यांसाठी व इतरांसाठी नेहमीच झालेला आहेयोजनेच्या प्रत्येक . कामात त्यांचा सक्रीय सहभाग असतो सोबतचतीनदा राज्यस्तरावर नवोपक्रमात पहिल्या पाच मध्ये निवड झालेली आहे.

नवोपक्रम अंतर्गत **"मैत्र बियांचे"** ही संकल्पना उत्कृष्टपणे राबविली असून त्याच्यामुळे पालक, बालक, समुदाय, किशोरीच्या सामाजिक मानसिकबौद्धिक , विकासाला चालना मिळेल यासाठी प्रयत्न केलेले आहेतसोबतच . बालकांना पुर्व शालेय शैक्षणिक ज्ञान" त्यासाठी ,सुरक्षितता मिळेल ही संकल्पना आहे ,**मैत्र बियांचे** " उपक्रम उपयुक्त असून बालकांच्या सर्वांगीण विकासासोबतच पर्यावरणाशी व अंगणवाडी उपक्रमाशी नाळ जुळण्यास सहाय्यकारी ठरेल याची काळजी घेतलेली आहे.

त्यांनी राबविलेले उपक्रम बालकांच्या पूर्व शालेय शिक्षणासाठी, तसेच **ICDS** मधील लाभार्थी गरोदर किशोरी ,स्तनदा ,यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरून सुपोषण वाढविण्यासउत्कृष्टपणे .वर्तणूक बदलासाठी या आधीही उपयुक्त ठरलेले आहेत , .प्रत्यक्ष राबविलेल्या नवोपक्रमाची शिफारस करण्यात येत आहे

श्रीसुनील मेसरे.
जिल्हा कार्यक्रम अधिकारी
जिल्हा परिषदवर्धा ,